जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2018
सकाळ

# पालकमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपणाला सुरवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : सरकारच्या ५० कोटी वृक्षलागवडीअंतर्गत जिल्ह्यात २८ लाख ७२ वृक्षांची लागवड केली जाणार आहे. उद्या (ता. १) पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शेंडापार्क तसेच शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपणाचा प्रारंभ होणार असल्याची माहिती मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील आणि उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ला यांनी आज दिली. वन विभागाच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मुख्य वनसंरक्षक पाटील म्हणाले, ''गेल्या वर्षी चार कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर वनवृत्तात ३९.०३ लाख वृक्षलागवड झाली. त्यापैकी १४ लाख ८१ हजार रोपांची लागवड कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाली आहे. या सर्वांमध्ये रोपांचे जीवंत राहण्याचे प्रमाण ९० ते ९५ टक्के आहे. यंदा एक कोटी १२ लाख रोपे लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. कन्या वन समृद्धी योजनेंतर्गत ज्या कुटुंबात मुलगी जन्माला येईल, अशा शेतकरी दाम्पत्याला साग पाच व फळझाडे पाच अशी दहा रोपे दिली जाणार आहेत. याशिवाय, इतर वृक्षांची लागवड केली जाणार आहे.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2018
लोकमत

# पालकमंत्री आज, उद्या कोल्हापुरात

लोकमत न्यूज नेटवर्क


कोल्हापूर : पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे आज, रविवारी व उद्या, सोमवारी जिल्हा दौऱ्यावर आहेत. आज, रविवारी सकाळी ९.३० वाजता शेंडापार्क येथे १३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत त्यांच्या हस्ते वृक्षलागवड होणार आहे.

शिवाजी विद्यापीठात १०.३० वाजता वृक्षारोपण समारंभास उपस्थिती, ११.३० वाजता तळसंदे येथील वृक्षलागवड कार्यक्रमास उपस्थिती. तसेच उद्या, सोमवारी सायंकाळी ५.४५ वाजता केशवराव भोसले नाट्यगृह येथे आयोजित 'राजा पंढरीचा' या भक्ती संगीताच्या कार्यक्रमास उपस्थित राहणार असून, त्यानंतर त्यांचे वाहनाने पुण्याकडे प्रयाण होणार आहे.

1 JUL 2018
महाराष्ट्र टाइम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भोगलं, ते मांडलं...

बाळासाहेब पाटील
Balasaheb.Patil@timesgroup.com



**साहित्य अकादमीच्यावतीने देण्यात येणारा मराठी भाषेतील युवा साहित्य अकादमी पुरस्कार नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' कादंबरीला नुकताच जाहीर झाला. 'फेसाटी'मध्ये गोरे यांनी दुष्काळी भागातील तरुणाचा संघर्षपट मांडला आहे. हा नेमका संघर्ष कसा उतरत गेला, याविषयी त्यांनी महाराष्ट्र टाइम्सच्या टीमशी मनसोक्त संवाद साधला.**

चॅट रूम

**■ तुमचा आजपर्यंतचा कौटुंबिक आणि शैक्षणिक प्रवास कसा झाला?**

▶ माझ्या जन्माअगोदरपासून कर्ज, दुष्काळ आमच्या घरात आहे. माझ्या जन्माआधी घरात मेंढरं होती. सहा बहिणी, त्यांचा सांभाळ आणि लग्नं या सगळ्यात आईवडिलांची तारेवरची कसरत व्हायची. जमिनीतून फारसे उत्पन्न नाही. मी सर्वांत लहान, एक भाऊ अपंग. घर चालविण्यासाठी आई, बहिणी मजुरी करायच्या. प्रचंड त्रास व्हायचा. एका बहिणीचं लग्न झालं, त्याचं कर्ज फिटलं की, मग दुसरीचं लग्न, असा डोंगर वाढत राहिला. त्यापोटी काही जमीनही विकावी लागली. मला समजू लागलं तसं कामाला जुंपून घेतलं. काम करत शिकलो. परिस्थिती बिकट झाली तेव्हा काही वेळा शिक्षण सोडूनही दिलं. पण आईवडिलांना मी शिकावं, असं खूप वाटायचं. आमच्या समाजात सातवी- आठवी शिकलं की कामाला जाण्याचं प्रमाण जास्त. मी राहतो तेथून तीस चाळीस किलोमीटरवर समाजातील दोन मुलं सैन्यात आणि पोलिसांत भरती झाली. आई त्याचं उदारहरण देऊन 'तू फौजदार हो, मिलिटरीत जा,' असं सांगायची. एकेक दिवस असा गेला की, घरात काही खायला नसल्यानं उपाशी झोपलो. त्यामुळं राबलो तरच काही मिळेल, शिक्षणात काही राम नाही, असं वाटायला लागलं. पण चांगले शिक्षक मिळाले आणि इथंवर आलो. आताही ढासळून गेलो असतो. पण, डॉ. शिंदे यांनी खूप उभारी दिली. बीए करत असताना गड्यांसोबत उसाची उचल घ्यायला सुरू केली. काम करत शिकत गेलो. चांगले गुण मिळत गेले. एकपाठी असल्यानं उत्तीर्ण होत गेलो. शिवाजी विद्यापीठात एमएला आल्यानंतर विभागात फार काळ राहत नव्हतो. एक न्यूनगंड होता. त्यामुळं फार मिळून मिसळून राहत नव्हतो. एटीएम सेंटरवर नाइटला ड्युटी करणं, नवीन बांधकामावर पाणी मारणं, असं काही करत होतो. हजार, दीड हजार रुपये मिळाले की खर्च भागत असे. उरलेले पैसे घरी पाठवत होतो. एमएच्या दुसऱ्या वर्षाला असताना कर्ज प्रचंड वाढलं होतं. म्हणून पुन्हा उसाची उचल घेतली. उसाचा पट्टा पडला आणि परीक्षेला गेलो. पण अभ्यास झाला नसल्यानं भाषाविज्ञान विषयात नापास झालो. पुढे तो विषय सोडवला आणि बीएड्ला बीटी कॉलेजला प्रवेश घेतला. तेथे रोज उपस्थिती गरजेची होती. कामामुळे ते शक्य नव्हते. अखेर तिथला प्रवेश रद्द करून खासगी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. काम करत बीएड् पूर्ण केले. बीएड् झाल्यावर विद्यापीठात आता प्रोजेक्ट फेलो म्हणून काम करतोय. कोल्हापुरात आल्यावर जग वेगळंच होतं. आपल्यात काहीतरी कमी आहे, ही भावना बळावत चालली. त्यामुळे बाजूला बाजूला राहत होतो. कामाची कधी लाज वाटली नाही. जेवढं काम करतो तेवढा मला आनंद मिळतो. पुढे मित्रांच्या संगतीत आल्यानंतर आत्मविश्वास वाढला. विष्णू पावले, विनोद कापसे या दोघा मित्रांनी खूप आधार दिला. आजही संघर्ष सुरूच आहे. मला जास्त काही मिळावं अशी स्वप्न नाहीत, पण जेमतेम जगण्यासाठी काही मिळावं एवढीच कुटुंबाची अपेक्षा आहे.

**■ आपण हे लिहिलं पाहिजे असं तुम्हाला कधी वाटलं?**

▶ माझ्यापेक्षा मित्र विष्णू पावलेला याचं श्रेय दिलं पाहिजे. एमएच्या शेवटच्या वर्षाला असताना हे काम हाती घेतलं. तू लिहिता हो, हे त्यानं सांगितलं. गप्पा मारताना माझीच कथा सांगायचो. मग त्यांनी मला काहीही लिहा पण, लिहा असं सांगितलं. मी दुष्काळावर सहा सात पाने लिहून त्यांना वाचायला दिली. ती जमली होती. त्यांनी अजून थोडा बदल करून कथा आकाराला आली. मला उत्साह आला. त्यावेळी कथा बाजूला ठेवून थोडं विस्तारानं पटच लिहायला घ्या, तुम्ही जे भोगलंय, तुमचा परिसर काहीही लिहा, असा सल्ला दिला. पुढे वर्षभर अखंड लिहित होतो.

**■ 'फेसाटी' कादंबरी लेखन करताना नेमकी काय तयारी केली आणि कादंबरीकार म्हणून चित्र उभं करण्यासाठी काय केलं?**

▶ तसं पहायला गेलं तर खास तयारी नव्हती. मला वाटेल तसं लेखन करत गेलो. कादंबरी पूर्ण झाल्यावर डॉ. रणधीर शिंदे यांना वाचायला दिले. त्यांनी वाचून काही सूचना केल्या, अजून विस्ताराने लिहायला लावले. मग मी ते वाढवले आणि जमत गेलं. धनगर समाजाच्या चालीरीती, रुढी परंपरेभोवती कादंबरी फिरत जाते. त्या वातावरणाशी अगदी एकरूप झाल्याने ते उतरत गेलं. तसा सर्व अंगांनी दुष्काळी भागात असल्यानं फारसं वाचनही झालं नव्हतं. त्यामुळं कुणा एका लेखकाचा प्रभावही नव्हता. शिवाय तसा आमचा परिसर साहित्यिकदृष्ट्या उपेक्षितच. तेथील माणसं, भाषा, परिसराचे फारसे चित्रण झाले नव्हते. ते मांडण्याचा प्रयत्न केला.

**■ ग्रामीण कथा, कादंबरीचा लेखक शहरात आल्यानंतर त्याच्यावर शहरी भाषेचा प्रभाव पडतो. परिणामी ग्रामीण साहित्याचे अस्सलपण टिकत नाही, असे बोलले जाते. तुमच्या कादंबरीचा पट ग्रामीण आणि तुम्ही लिहिली शहरात. तरीही भाषाशैली हे कादंबरीचे वैशिष्ट्य ठरले आहे. याबद्दल काय सांगाल?**

▶ गाव सोडून शहरात आलो तरी माझ्या भाषेत फरक पडला नाही. घरात, परिसरात बोलतात तीच भाषा कादंबरीत वापरली. लिहिताना द्विधा मनःस्थितीत कधीच सापडलो नाही. अमूक एक शब्द असाच वापरावा, असे कोणतेच बंधन नव्हते. त्यामुळे ओघवत्या शैलीत लेखन होत गेले. कादंबरी लिहिल्यानंतर आम्ही खूप चर्चा केली. 'फेसाटी' हे शीर्षक पावले यांनी दिले. हे शीर्षक बदलू असं मी म्हणत होतो, पण डॉ. शिंदे यांनी त्यावर शिक्कामोर्तबच केलं. 'फेसाटी'वरून आम्ही भरपूर चर्चा केली. कोल्हापूर भागात पेरणी केलेल्या भातावर ओढण्यासाठी फेसाटी वापरली जाते. अन्य भागात वेगळ्या अर्थाने तो शब्द वापरला जातो.

**■ 'फेसाटी'ची दुसरी आवृत्ती आता येतेय, वर्षभरात मराठी साहित्यविश्वात तिचे कसे स्वागत झाले?**

▶ कादंबरीचे खूप स्वागत झालं. आनंद विंगकर, राहुल पाटील यांच्यासह काहींनी त्यावर विस्तारानं लिहिलं. रा. रं. बोराडे, सतीश काळसेकर, रंगनाथ पठारे यांनी कादंबरी वाचून प्रतिक्रिया दिल्या. भालचंद्र नेमाडे यांनी एका बैठकीत कादंबरी वाचून सकाळी फोन केला, हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचं होतं.

**■ साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्यानंतर पहिली प्रतिक्रिया काय होती?**

▶ छान वाटलं. डॉ. शिंदे यांनीच फोनवरून भावाला ही माहिती दिली. आई कामाला गेल्यानं तिला संध्याकाळी कळालं. नेमकं काय मिळालं हे तिला माहीत नाही. पण, कुठलातरी मोठा पुरस्कार मिळालाय हे तिला कळलं तेव्हा ती रडायला लागली. आई विचारायला लागली की, काय मिळालं? उद्या पेपरमध्ये येईल ते वाचून बघा, असे सांगितल्यावर ती आणखीच हरखून गेली. पेपरात नाव आलं म्हटल्यावर मी खूप मोठा झालो, असे तिला वाटले आणि ती रडायलाच लागली.

**■ कादंबरी लेखनाची प्रक्रिया कशी होती?**

▶ बहुतांश लेखन रात्री दहानंतर केले. एकदा बसलो की माझ्याच विश्वात हरवून पहाटेपर्यंत लिहायचो. एखादा प्रसंग लिहिताना आसपासचे भान नसायचे. टायपिंगसाठी पैसे नसल्याने हातानेच लिहून काढली. या कादंबरीतील काही पात्रे बदलली. नाथा हे माझ्या नावाशी साधर्म्य ठेवणारे असल्याने ते तसेच ठेवले. बाकी ७० ते ८० टक्के नावे बदलली. कथानक लिहितातातना जो प्रसंग लिहायचा होता तो परफेक्ट झाल्यानंतरच लिहायला बसायचो. त्यामुळं लेखन उत्स्फूर्तपणे उतरत गेलं.

**■ आगामी काय लेखन सुरू आहे? तुम्ही काय वाचता?**

▶ आमच्या आसपास पारधी समाज खूप मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्यावर आजही चोरी, दरोड्यांचा शिक्का बसलेला आहे. या समाजाचं चित्रण अजूनही झालेलं नाही. आगामी कादंबरी या विषयावरच आहे. मला कादंबरी आणि कथा हा वाङ्मय प्रकार आवडतो. विद्यापीठात तर माझ्यासमोर दालनच खुले आहे. व्यंकटेश माडगूळकर, सखा कलाल, चारुता सागर, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिवे, राजन गवस, रंगनाथ पठारे, नेमाडे हे माझे आवडते लेखक आहेत.